# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक -२ ऑक्टोबर २०१५

## लोकसहभागातून होणार 'क्लीन इंडिया'- मा. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस

मुंबई - भारताचे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेले 'स्वच्छ भारत' अभियान हे एक जन आंदोलन असून लोकसहभागातून स्वच्छ भारत ही संकल्पना सत्यात उतरणार असल्याचे प्रतिपादन मा.मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबई विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता अभियान रॅलीच्या कार्यक्रमात केले. २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंतीच्या निमित्ताने मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागाच्या वतीने स्वच्छता अभियान आणि सदभावना रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.पुढे ते म्हणाले की,एकीकडे देश विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कक्षा रुंदावत असताना देशातील काही भागात अजूनही उघड्यावर शौचास बसणे, सांडपाणी आणि घणकचरा या समस्या भेडसावत आहेत आणि यातूनच मार्ग काढण्यासाठी क्लीन इंडिया ही संकल्पना राबविली जात आहे,ज्याच्यामाध्यमातून निसर्गाशी साधर्म्य साधणारे वातावरण निर्मिती करण्यासाठी हे अभियान राबविले जात आहेत.लोकांच्या संकल्पातूनच स्वच्छ भारताचे स्वप्न सत्यात उतरणार असल्याचेही त्यांनी सांगितले.ख-या अर्थाने भारताला महाशक्ती बनविण्यासाठी सर्वांनी क्लीन इंडियाच्या स्वप्नपूर्तेसाठी संकल्प करण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.विधी विभागाने हाती घेतलेला हा अत्यंत स्तूत्य उपक्रम असून विद्यार्थ्यांच्या संकल्पातून परीवर्तनाची लाट निर्माण होणार असल्याचा आशावादही त्यांनी यावेळी व्यक्त केला.मा.मुख्यमंत्री यांनी हिरवा झेंडा दाखवून यावेळी स्वच्छता अभियान आणि सद्भावना रॅलीचे उदघाटन केले.

याप्रसंगी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख म्हणाले की,मुंबई विद्यापीठाने सुरु केलेला हा अत्यंत स्तूत्य उपक्रम आहे. मुंबई विद्यापीठ ज्ञानदानाच्या पवित्र कार्याबरोबरच देशाची ज्ञानविषयक गौरवशाली परंपरा आणि वाढता सामाजिक-आर्थिक प्रभाव पाहता मुंबई विद्यापीठ सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून नेहमीच अशा अभिनव उपक्रमांसाठी तत्पर राहणार आहे.तर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना विधी विभागाचे प्रमुख डॉ.अशोक येंडे म्हणाले की, विधीच्या क्षेत्रात येऊ पाहणा-या विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी,सलोखा आणि कर्तव्य या मुल्यांची ओळख व्हावी तसेच समाजसेवेतून राष्ट्रहीत साधण्याच्या दृष्टिकोनातून हे अभियान आयोजित करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.या अभियानामध्ये विधीचे शिक्षण घेणारे जवळपास ४०० विद्यार्थी १५ एनजीओ,विधीतज्ज्ञ,शिक्षक,सामाजिक कार्यकर्ते आणि प्रशासकिय अधिकारी या स्वच्छ भारत अभियानामध्ये सहभागी झाले होते. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख हे स्वतः विद्यार्थ्यांसोबत स्वच्छता अभियानामध्ये सहभागी झाले होते. सकाळी ९.३० वाजता सुरु करण्यात

आलेली ही रॅली हुतात्मा चौक ते सीएसटी ते आझाद मैदान असा प्रवास करत अनेक विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने स्वच्छता अभियानामध्ये सहभाग घेतला होता.

तर याच दिवसाचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या ‘मुनीजन’या कार्यक्रमात या वर्षीची विजेती टीम म्हणून टीम संजीवनीला (वेलिंगकर स्कूल)प्रथम पारितोषिक बहाल करण्यात आले. मुनीजन-२०१५ या वर्षीची संकल्पना सेंसीटायझेशन-सॅनिटेशन ही होती.मुंबई विद्यापीठाशी सलंग्नित असलेल्या १० व्यवस्थापन संस्था आणि महाविद्यालयांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता.

तर विश्व अहिंसा दिवसाच्या निमित्ताने मुंबई विद्यापीठाने गेट-वे ऑफ इंडिया येथे संध्याकाळी ४.३० वाजता भजनसंध्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमामध्ये सिने जगतातील निर्माता,दिग्दर्शक,गायक,संगितकार यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली होती ,यामध्ये निर्माता – दिग्दर्शक विरेंद्र प्रधान, संगीतकार,निलेश मोहरीर,गायिका मृदूला धिडे-जोशी,वैशाली भैसणे माडे आणि जाझिम यांनी त्यांच्या सुमधुर स्वराने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभाग,सांस्कृतिक विभाग,संगीत विभाग,लोककला अकादमी,आजीवन अध्ययन विभाग,एनएसएस आणि एनसीसी या सर्व विभागाच्या सयुंक्त विद्यमाने भजनसंध्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)